भगवंता

इथे कोण आला, कधी कोण गेला
क्षण हातचा रे, सुटूनिया गेला
तूची एक शाश्वत, अनादी अनंता ॥ १ ॥

काय कमवायचे आहे, खर्चायाचे काय
इथे काय घेऊनि आला, राहणार काय
निर्विकार होते मन, या विचाराशी थांबता ॥ २ ॥

उणे वागायचे नाही, गुणायाचे सत्व कर्म
अधिकन्यून काही होता, फेडणे इथेच मर्म
नामबोध घेता तुझा, लाभे सार्थ शांतता ॥ ३ ॥

© सपु,
www.saarthbodh.com

- सचिन कुलकर्णी